ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.077
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
Oct-Nov -Dec 2023
Vol. 12 No. 4

# एस. सी., एस. टी., ओबीसी यांचे ध्रुवीकरण: काशीरामाच्या दृष्टीकोनातून

**प्रा. प्रभुदास खाबडे**
पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग
नेसावि, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , पुणे
*Corresponding Author:* ***प्रा. प्रभुदास खाबडे***

**DOI - 10.5281/zenodo.10578869**

**प्रस्तावना:**

प्राचीन भारताचा इतिहास हा अवैदिक विरूध्द वैदिक संघर्षाचा आहे. 7 व्या शतकापर्यंत भारतात चातुर्वर्ण्य व्यवस्थाहोती. या शतकानंतर वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीव्यवस्थेमध्ये करण्यात इथली मनुवादी व्यवस्था यशस्वी झाली. जातीव्यवस्थेच्या आधारे इथल्या मूलनिवासी लोकांमध्ये फूट पडली. परिणामी आधारे त्याच्यातली एकजिनसीपणा नष्ट झाला. आजही इथला मूलनिवासी समाजवेगवेगळया जातीत विभागलेला आहे,तो आपण एक आहोत हे विसरून आपापसात लढत आहे. त्यामुळे त्याची सामाजिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात पिछेहाट होवून, शोषणहोत आहे.

मूलनिवासी लोकांच्या विभागणीकडे, शोषणाकडे प्राचीन काळापासून अनेक तत्वचिंतक, समाजसुधारकांनी लक्ष वेधले व त्यांना एकत्र आणण्याचे प्रयत्न केले. यामध्ये चार्वाक, गौतमबुध्द, संत रविदास, संत तुकाराम, छ. शिवाजी महाराज, पेरियार रामस्वामी, क्रांतीबा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विशेष प्रयत्न केले. या सर्व महापुरुषांच्या या कार्याच्या पार्श्वभूमीवर काशीराम यांचे या क्षेत्रातले योगदान अभ्यासणे महत्वाचे ठरते.

**अभ्यासाचा उद्देश :**

1. भारतातील जातीव्यवस्थेचे आकलन करून घेणे.
2. जातीनिर्मूलनासाठी/एकत्रीकरणासाठी झालेल्या प्रयत्नाचा अभ्यास करणे.
3. जातीनिर्मूलनाच्या प्रक्रियेतील एक घटक म्हणून जातीच्या एकत्रीकरणासाठी काशीरामांनी केलेल्या सामाजिक व राजकीय प्रयत्न समजावून घेणे.

**तथ्य संकलनाची पध्दती:**

प्रस्तुत अभ्यासासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. दुय्यम तथ्य संकलन हे विविध ग्रंथ नियतकालिके, वर्तमानपत्रे इ. द्वारे संकलित केलेले आहे.

**सैध्दांतिक द्रष्टीकोन:**

प्रस्तुत अभ्यास हा फुले, शाहू, आंबेडकर यांच्या भारतातील जात वास्तव व जातनिर्मूलनासाठी जातीचे ध्रुवीकरण या दृष्टीकोनावर आधारलेला आहे.

**अभ्यासाची मर्यादा:**

1. दुय्यम तथ्यसामग्रीचा उपयोग करण्यात आलेला आहे.
2. या अभ्यासासाठी प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर कालखंडाचा विचार केलेला आहे.

**विषयाचा पूर्व अभ्यास:**

भारतात एस. सी., एस. टी., ओबीसी यांच्या ध्रुवीकरणाचा अभ्यास भारतातील सामाजिक विचारवंताद्वारे करण्यात आला आहे. यामध्ये झेलियट ऐलिनार (1992) विवेक कुमार (2013) From Untouchable to Dalit, Eassay on the Ambedkar Movement] चांद मुल (1992) The Bahujan and their Movement, ओमवेट गेल (1994) Kanshiram The BSP in K. L. Sharma (ed.) Caste and Class in India, विवेककुमार (2013) Dalit Assertion & Bahujan Samaj Party या सर्व विचारवंतांनी काशीराम व त्यांचे चरित्र व राजकारण या अनुषंगानी लिखाण केले आहे. भारतातील एस. सी., एस. टी., ओबीसी यांच्या ध्रुवीकरणाबाबतचा दृष्टीकोन यासंशोधनात आढळत नाही.

**जातीच्या ध्रुवीकरणासाठी झालेले प्रयत्न:**

प्राचीन भारताच्या इतिहासात दैदिप्यमान समतेवर आधारलेला बौद्ध कालखंड दिसतो. ज्यावेळी भारत जगामध्ये ज्ञान, विज्ञान, मानवतेच्या क्षेत्रात महासत्ता होता. तर दुस्या बाजूला विषमतेवर, शोषणावर आधारलेला वैदिक कालखंड दिसतो. या कालखंडाने मानवतेला काळिमा फासणारी जातीव्यवस्था भारताला दिली. ज्यामुळे भारताचे स्थान जगात कोणत्या क्षेत्रात आघाडीवर राहिले नाही. या वैदिक व्यवस्थेच्या आर्य/ब्राह्मणांनी इथल्या एकसंघ असणाऱ्यालोकांचेशोषण करण्यासाठी त्यांची विभागणी साडेतीन हजार जातीत करून त्यांच्यात द्वेष भावना निर्माण केली. त्यामुळे इथला मूळनिवासी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात पाठीमागे पडला. त्याचे शोषण व अधोगती याचे मूळ जातीसंस्था

आहे. हे चार्वाक, गौतमबुध्द, संत रविदास, संत तुकाराम, छ. शिवाजी महाराज, पेरियार रामस्वामी, क्रांतीबा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आण्णा भाऊ साठे इ. सारख्या विचारवंतानी, समाजसुधारकांनी ओळखले आणि जातीसंस्था नष्ट करण्यासाठी त्यांनी वेगवेगळया पध्दतीने वेगवेगळया पातळीवर प्रयत्न केले.

गौतम बुध्दांनी 'चरथं भिक्कवे चारिकम् बहुजन हिताय, बहुजन सुखाय' असा संदेश देवून, संत रविदासांनी आपल्या दोह्यातून, तुकारामांनी अभंगातून, छ. शिवाजी महाराज व छ. शाहू राजांनी आपल्या राज्य प्रशासनातून तर पेरियार व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लिखाणातून, सामाजिक व राजकीय कार्यातून, शुद्र, अतिशुद्र, पददलित, शोषित समाज हा सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया एकच आहे हे समजावून सांगितले[1] डॉ. आंबेडकरांनी शुद्र वर्णात असलेल्या ओबीसी समाजाला त्याचे मूळ समजावून देण्यासाठी शुद्र पूर्वीकोणहोते या ग्रंथाची निर्मिती केली. तर अस्पृश्यांचे मूळ मूळ समजावून देण्यासाठी अस्पृश्य पूर्वीकोण होते या ग्रंथाची निर्मिती केली. उच्चवर्णियांनी कपटनीतीने देशात जातीसंस्था कशा निर्माण केल्या. याचा अभ्यास करून ''भारतातील जाती'' हा प्रबंध तयार केला. आर्य ब्राह्मण निर्मित जाती कशा नष्ट होतील याचे तंत्र ''जातीभेदाचे निर्मूलन'' या प्रबंधात नमूद केले. परंतु आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांचे आकलन त्याकाळी शुद्र व अतिशुद्र समाजाला खऱ्या अर्थाने झाले नाही.[2] डॉ. आंबेडकरांनी आपल्या हयातीत राज्यघटनेद्वारे व राजकारणाद्वारे पददलित, शोषित, शुद्र, अतिशुद्र समाजाला एकत्र आणून त्यांच्या विकासाच्या व शोषणमुक्तीच्या वाटा निश्चित करून ठेवल्या. पण ब्राह्मणवादयांनी शुद्रांना, अतिशुद्रांना, ओबीसीना कधीच एक होवू दिले नाही. यासाठी त्यांनी कधी वेद,शास्त्रे,पुराण, ब्राह्मणके, मनुस्मृती इ. धर्मशास्त्रांचा, कधी संतवचनांचा, कधी सामाजिक असहकाराचा तर कधी जातीयता व अंधश्रध्देचा तसेच कर्मकांडाचा फुटीचे शस्त्रम्हणून उपयोग केला.[3]

डॉ. आंबेडकरांनी इथल्या शुद्र अतिशुद्र, शोषित, पददलित समाजाला एकत्र करून त्यांना शोषणमुक्त करण्यासाठी दोन संदेश दिले, 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' व दुसरा 'राजकीय सताकोणत्याही समस्येचे निराकरण करण्याची गुरूकिल्ली आहे.'[४] या संदेशानुसार आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या राजकीय पक्षाची स्थापना केली व शुद्र, अतिशुद्र, पददलित, शोषित यांच्यात स्वाभिमानी राजकीय महत्वाकांक्षा निर्माण केली. तर रिपब्लिकन पक्षाद्वारे भारतातील सर्व शोषित, पददलित, शुद्र, अतिशुद्र यांना एकत्र करून

राजकीय सत्ता मिळवून देण्याची त्यांची योजना होती. पण 1956 ला त्यांचे महापरिनिर्वाण झाले व त्यांच्या चळवळीला उतरती कळा लागली. त्यांचे काही अनुयायी काँग्रेसकडे गेले तर काही अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना (1957) केली. स्थापनेपासूनच रिपब्लिकनला फुटीचे ग्रहण लागले.[5] आज रिपब्लिकनचे ५५ गट कार्यरत आहेत. काही अपवाद वगळता हे गट पूर्वीची महार जात व आजचे बौद्ध यांच्याशी मर्यादित आहेत. त्यांनी आपला पाया शुद्र,अतिशुद्रापर्यंत पसरवण्याचा फारसा प्रयत्न केला नाही.

**जात निर्मूलनासाठी, जातीच्या ध्रुवीकरणासाठी काशीरामांनी केलेले प्रयत्न:**

या पार्श्वभूमीवर पंजाबमधीलहोशियारपूर येथे जन्मलेल्या व पूणे येथे ई. आर. डी. एल. मध्ये सहाय्यक संशोधक म्हणून काम करत असलेल्या व म.फुले, छ.शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गुरूस्थानी मानलेल्या काशीरामाचे कार्य महत्वाचे ठरते. पुण्यात काम करत असताना दिनाभाना नावाच्या चतुर्थ कर्मचाऱ्यावर झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करताना इथल्या जातीव्यवस्थेची दाहकता त्यांना अनुभवाला आली. याचकाळात त्यांच्या वाचनात डॉ. आंबेडकरांचा ‘‘जातीभेद निर्मूलन’’ हा ग्रंथ आला. त्यांनी हा ग्रंथ२१ वेळा वाचला.[६] त्याने प्रभावित होवून त्यांनी डॉ आंबेडकरांचे पददलित,शोषित समाजाला एकत्र करून जातीसंस्था नष्ट करण्याचे स्वप्न पूर्ण करण्याचे ठरविले. हे त्यांच्या घोषणेतून प्रकट होताना दिसते.

बाबा तेरा मिशन अधूरा

काशीराम करेगा पूरा

त्यासाठी काशीरामांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. भारतातल्या जातीव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. डॉ. आंबेडकरांच्या राजकीय चळवळीचा सखोल अभ्यास केला व राजकीय चळवळीच्या अपयशाची कारणमीमांसा केली. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की – आंबेडकरांच्यानंतर त्यांच्या स्वाभीमानी राजकीय चळवळीला नेतृत्व देण्याची ज्यांची जबाबदारी होती ते वेगवेगळ्या राजकीय पक्षांना विकले गेले. आंबेडकरांच्या चळवळीपासून आरक्षणाचा लाभ घेतलेला शिक्षित कमचारीवर्ग बाजूला होता. काशीरामांनी अशा नेत्यांना चमचा असे म्हटले आहे. या संदर्भातील त्यांचे ‘चमचा युग’ हे महत्वाचे पुस्तक आहे. या वर्गाला चळवळीत घेण्यासाठी त्यांनी द आ॑ल इंडिया बॅकवर्ड ॲन्ड मायनॉरिटीज कम्युनिटीज इम्लॉईज फेडरेशन म्हणजेच बामसेफची स्थापना केली.[7] ही संघटना वैचारिक क्रांतीची संघटनाहोती.8 या संघटनेच्या

माध्यमातून त्यांनी देशभरदौरे, मेळावे घेवून लोकांच्यामध्ये सामाजिक व राजकीय जागृती आणली. या राजकीय जागृतीला दिशा देण्यासाठीच काशीराम यांनी डी. एस. फोर (दलित, शोषित, समाज, संघर्ष, समिती) (6 डिसेंबर 1981) स्थापना केली. या संघटनेचा सदस्य फक्त अब्राह्मण व्यक्तीच बनू शकत होता,9 हे त्यांच्या नाऱ्यावरून स्पष्ट होते. क्षत्रिय ब्राह्मण,बनिया छोड बाकी सब डी. एस. फोर यावरून संघटनेचा उद्देश पूर्ण करण्यासाठी काशीरामांनी दोन घोषणा दिल्या. 1. वोट हमारा राज तुम्हारा नही चलेगा नही चलेगा, २. जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी हिस्सेदारी.10 या संघटनेला येणारे राजकीय यश पाहून काशीराम यांनी 14 एप्रिल 1984 ला बुध्दांच्याद्वारे निर्मित व फुलेद्वारा प्रचारीत बहुजन हा शब्द घेवून बहुजन समाज पक्ष या राजकीय पक्षाची स्थापना केली.11 काशीरामांनी भारतीय राजकारणात बहुजन संकल्पना रूजवलीच, पण तिला विकसीत ही केले. त्यांच्या बहुजन संकल्पनेत त्यांनी एस. सी., एस. टी., ओबीसी, धार्मिक अल्पसंख्याक गटांचा समावेश होतो. म्हणजेच त्यांनी 15 विरूध्द 85 हे नवे सूत्र राजकारणात प्रस्थापित केले.12 काशीरामांना हे माहित होते की, बहुजन समाज बनविणे कठीण काम आहे. ज्यांनी हजारोवर्षापासून बहुजन समाजाला फोडण्याचे काम केलेले आहे तेसमाज आज सत्तेत आहे. आणि तोबहुजन समाजाला एक होवू न देण्याचे काम करत आहे. पण काशीराम म्हणतात, ‘‘आपले काम बहुजन समाज बनविणे हे आहे.’’ त्यासाठी काशीरामांना जाती नष्ट करावयाच्या होत्या. ते एके ठिकाणी म्हणतात की मनुवादी व्यवस्था नष्ट केल्याशिवाय जाती नष्ट होणार नाहीत. म्हणून मला जातीवाद्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्थेबरोबर जातीवादी हत्याराने लढायचे आहे. वेगवेगळया जातींना त्यांच्या जातींची जाणीव निर्माण करून एकजुटीने लढाई जिंकणे आणि बहुजन समाजाच्या नावाने त्यांने सत्तेवर बसविणे हे माझे ध्येय आहे. हे काम काँग्रेस, भाजपा आणि हिंदूवादी पक्ष आहेत त्यांना पाठिमागे ढकलल्याशिवाय शक्य नाही. मी आता चांभार म्हणूनच पुढे जावू इच्छितो. पण शेवटी बौध्द धर्माची दिक्षा घेणार आहे. पण काशीरामांनी चिंतनातून जाती विनाश अशक्य आहे हे पुरेपूर ओळखलेले होते. म्हणूनच त्यांनी जाती विनाशाऐवजी, जाती विनाशासाठी जातीचेतनेचे वापर करण्याची कल्पना अंमलात आणली. काशीरामांनी राजकारणामध्ये जातीचेतनेचे असे सूत्र निर्माण केले की, ज्यामुळे हजारोवर्षापासून शासनावर वर्चस्व असणाऱ्या जातीचे वर्चस्व कायमचे तुटले.13 बहुजन समाज पार्टीच्या माध्यमातून त्यांनी मंडल अयोग लागू करण्यासाठी 1 आॅगस्ट 1985 ते 14

आ ॅगस्ट 1984 पर्यंत जेलभरोआंदोलन केले. असेच आंदोलन अन्य राज्यात जिल्हा मुख्यालयासमोर करण्यात आले. मंडल आयोग लागू करण्यासाठी बसपाने चालविलेले हे देशातील पहिले आंदोलन होते. या आंदोलनामुळे ओबीसी समाजामध्ये जागृती आली व मंडल आयोग लागू करणे व्ही. पी. सिंगना आवश्यक बनले.

काशीरामांच्या या राजकारणाचा एवढा परिणाम झाला की, मंडलोत्तर काळात उच्चवर्णियांची सत्ता लयास जाण्यास सुरूवात झाली. भारतातल्या अनेक घटकराज्यात बहुजन समाजातील म्हणजेच एस. सी., एस. टी., ओबीसी जातीचे मुख्यमंत्री दिसून लागले याचे उत्तम उदाहरण म्हणजे उत्तरप्रदेशात मायावती चारवेळा मुख्यमंत्री बनल्या काशीरामांनी सत्तेसाठी बऱ्याचवेळेला भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्षाशी सहकार्य केले. त्यामुळे काही विश्लेषक त्यांना संधीसाधू मानतात[14] याबद्दल काशीराम म्हणतात की, बहुजन समाजाला सत्ता मिळविण्याची मी संधी शोधत असतो. म्हणून तर त्यांनी घोषणा दिली. मुझे मजबूत सरकार नही मजबूर सरकार चाहिए[15] कारण स्वातंत्र्यानंतर केंद्रात मजबूत सरकार असल्यामुळेच बहुजन समाज सामाजिक, आर्थिक, राजकीय बाबतीत अधोगतीला पोहोचला आहे, हे त्यांनी Why Bahujans are dependent in Independent India या पुस्तकात स्पष्ट केले.[16] काशीरामांच्या या धोरणामुळे आणि बहुजन समाज पार्टीचा प्रभाव वाढल्यामुळे केंद्रात आणि घटकराज्यांतही आघाडी सरकारे सत्तेत येत आहेत. त्यामुळे बहुजन समाजाला राजकीय सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळत आहे.

**निष्कर्ष:**

काशीरामांच्या वैचारिक व राजकीय कार्यामुळे भारतातील एस. सी., एस. टी., ओबीसी, धार्मिक अल्पसंख्यांक यांच्यामध्ये सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे समाज जोस्वतःला उच्चवर्णीय समजतोत्यालाही समजून चुकले कि,आपण व्यवस्थेचे बळी आहोत. त्यामुळेच त्यांच्यातील जातीची तीव्र भावना हळूहळू नष्ट होत आहे. व बहुजन समाज या नावाखाली एकत्र येत आहेत व त्यांच्यातील दरी दिवसेंदिवस कमी होत आहे. महाराष्ट्रासारख्या घटकराज्यात संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, ओबीसी सेवा संघ यासारख्या संघटना जातीच्या ध्रुवीकरणासाठी प्रयत्न करताना दिसतात. तसेच वर्तमानकाळात भटक्या विमुक्तांनी आणि काही ओबीसी जातींनी बौ धर्म स्विकारला आहे. त्यामध्ये काशीरामांची भूमिका महत्वाची आहे. याचे सारे श्रेय काशीरांमाच्या दूरदृष्टीला दयावे लागते

**संदर्भ सूची:**

1. गजभिये अशोक, मानवतावादी काशीराम, सुयोग प्रकाशन, कल्याण, 2000, पृ.78.
2. कित्ता, पृ. 78
3. कित्ता, पृ.79
4. नैनीशराय मोहनदास, बहुजन नायक काशीरामका जीवन संघर्ष,कांती पब्लिकेशन, दिल्ली,2008, पृ. 33
5. रामचंद्र, हमारे मध्य मान्यवर काशीराम, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली,2011,पृ. 41
6. गजभिये अशोक, मानवतावादी काशीराम, सुयंग प्रकाशन, कल्याण,2000, पृ.34
7. उपरोक्तपृ.36
8. रामचंद्र, हमारे मध्य मान्यवर काशीराम, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली, 2011, पृ.
9. उपरोक्तपृ. 46
10. उपरोक्त पृ. 47
11. नैनीशराय मोहनदास, बहुजन नायक काशीरामका जीवन संघर्ष,कांती पब्लिकेशन, दिल्ली,2008, पृ.24
12. रामचंद्र, हमारे मध्य मान्यवर काशीराम, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली, 2011, पृ. 51
13. वर्मा, आर. पी., बहुजन नायक काशीराम,कांती पब्लिकेशन, दिल्ली, 2011, पृ. 45
14. गजभिये अशोक, मानवतावादी काशीराम, सुयोग प्रकाशन, कल्याण, 2000, पृ. 67
15. सतनाम सिंह, बहुजन नायक काशीराम,सम्यक प्रकाशन, दिल्ली, 2008, पृ. ४६
16. काशीराम, Why Bahujans are Dependent in Independent India?